# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.2333536-40, 2348001-05

E-mail contact@chhsambhajinagarmc.org, est1@chhsambhajinagarmc.org


जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२६/१०८७. दिनांक :- २५/०६/२०२६.

## जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील सरळसेवेची रिक्त २२२ पदे भरण्याबाबत जाहिरात जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२६/१८७. दि.१६/०२/२०२६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर पदांची लेखी ऑनलाईन परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| परीक्षेची दिनांक | परीक्षेस हजर होण्याची वेळ | सत्र | पदाचे नांव |
|---|---|---|---|
| दि.०८/०७/२०२६ (बुधवार) | सकाळी ०८.०० | प्रथम सत्र | १) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)<br>२) अग्निशामक<br>३) चालक-यंत्रचालक (Driver Operator) |
| | दुपारी १२.०० | द्वितीय सत्र | १) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)<br>२) रोखपाल<br>३) उद्यान सहाय्यक/कृषि सहाय्यक |
| | दुपारी ०४.०० | तृतीय सत्र | १) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निरीक्षक<br>२) उपअग्निशमन केंद्र अधिकारी |
| दि.०९/०७/२०२६ (गुरुवार) | सकाळी ०८.०० | प्रथम सत्र | स्वच्छता निरीक्षक |
| | दुपारी १२.०० | द्वितीय सत्र | १) अनुरेखक<br>२) सहाय्यक सुरक्षा अधिकारी<br>३) पशुधन पर्यवेक्षक |

सदर परीक्षेकरिता संबंधित उमेदवारांना SMS/Email द्वारे माहिती देण्यात येत आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट www.chhsambhajinagarmc.org मधील पदभरती २०२६ मध्ये Call letter बाबत दिलेल्या लिंकवरुन उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र Download करुन घ्यावे. **परीक्षा केंद्र व वेळ हे प्रवेशपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच राहील.** तसेच याबाबत काही अडचण निर्माण झाल्यास उमेदवारांनी http://cgrs.ibps.in/ या लिंकवर अथवा १८००२२२३६६ / १८००१०३४५६६ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. परीक्षेच्यावेळी उमेदवाराकडे प्रवेशपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही व याबाबत सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

प्रस्तूत परीक्षा I.B.P.S. या शासनमान्य संस्थेमार्फत घेण्यात येणार असून सदर परीक्षा ही पूर्णत: पारदर्शक पध्दतीने पार पडणार आहे. यासंदर्भात कोणत्याही आमिषाला किंवा भुलथापांना बळी पडू नये. नोकरी देण्याबाबत आर्थिक बाबींची मागणी झाल्यास पोलीसांकडे तक्रार करावी.

**आपणास परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा !**

Digitally signed by RANJEET A PATIL
Date: 25-06-2026 16:15:11

(रणजीत आ.पाटील)
अतिरिक्त आयुक्त-१
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका